नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/03/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## मोटरसायकल चोरी करणारे आरोपी गजाआड

## स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर ग्रामीणची कारवाई

दि. २८/०३/२०२३ रोजी चे २२.०० वा दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर ग्रामिण हद्दीतील सावनेर उपविभागात पाहीजे व फरार आरोपी शोध करीत असतांना नागपूर ते पांढुर्णा हायवे रोडच्या पुलाखाली ०४ इसम संशयित मोटरसायकलसह मिळुन आल्याने त्यांच्या चौकशी दरम्यान त्यांच्या ताब्यातून त्यांनी दिनांक २६/०३/२०२३ रोजी सावनेर तसेच ०१ वर्षाआधी चोरी केलेल्या ०२ मोटरसायकल मिळुन आले. करीता ०२ मोटरसायकल व ०४ आरोपी पोलीस स्टेशन सावनेर पुढील कायदेशीर कारवाई करीता पोलीस स्टेशन सावनेर यांच्या ताब्यात देण्यात आले.

**आरोपी**

**नामे– १)** सुनील गोदरसिंग धुर्वे, वय २१ वर्ष
२) जितेंद्र पन्नालाल धुर्वे, वय २१ वर्ष
३) धर्मेंद्र पन्नालाल धुर्वे, वय २२ वर्ष
४) मंजेश मोहन कुंभडे, वय २५ वर्ष सर्व रा. मोहपाणी (गोधी) ता. बिचवा, जि. छिंदवाडा (म.प्र.)

**जप्त मुद्देमाल**

आरोपीकडुन १) होंडा शाइन मोटरसायकल क्र. एम.एच–४०/ए.यु–१८२५
२) सी.डी डीलक्स मोटर सायकल क्र. एम.एच–३१/सी.ई–७५३०

वरीलप्रमाणे मुद्देमाल आरोपीकडुन जप्त करून पोस्टे सावनेर येथे मोटरसायकल चोरीचे गुन्हे दाखल असल्याने पुढील कारवाई कामी पोस्टे सावनेर यांच्या ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार राजू रेवतकर, पोलीस नाईक किशोर वानखेडे, आशिष मुंगळे, उमेश फुलबेल यांचे पथकाने केली.




## चोरी

**१) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील बस स्टॅन्ड सावनेर येथे दिनांक २८/०३/२०२३ चे १३/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— श्रीमती सुशीला रामचंद्र बुरूलेवार, वय ५९ वर्ष, रा. तिष्ठी मोठी ता. कळमेश्वर नागपुर जि. नागपुर ही आपल्या बहीन लेक सोबत कोराडीवरून तिष्ठी येथे नागपुर ते मध्य प्रदेश चालणाऱ्या खाजगी बस मध्ये बसुन सावनेर येथे आली असता. तेव्हा दुपारी ०१.३० वा. दरम्यान सावनेर वरून एस.टी महा मंडळच्या बस मध्ये चढत असता तेव्हा त्याचे लक्षात आले की, गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ४० ग्रॅम किमंती अंदाजे ४०,०००/— रू. चे कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा शिंदे ब. नं ११६१ मो. नं ९८२२९३२२५३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापा** :– अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील मौजा करजघाट शेत शिवार येथे दिनांक २७/३/२०२३ चे २२/०० वा. ते दिनांक २८/३/२०२३ चे ७/०० वा. फिर्यादी नामे– नत्थू लोभाजी ढोबळे, वय ५५ वर्ष रा. नंदापूर ता. सावनेर यांच्या शेतातील विहीरीवरील पाण्याच्या मोटारीचा कॉपर केबल २३ मीटर लांबीचा किंमती अंदाजे १५००/–रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ नारायण बोरकर बं.न १२९७ पो.स्टे खापा मो. नं. ९८२३५८१२९७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**